GEST070802
19-07-08

**चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीबाबत.**

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्र.आरटीआर-१४०८/प्र.क्र.६४/२००८/१३,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ८ जुलै,२००८.

वाचा :- १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.आरटीआर-१०८५/८५३/प्र.क्र.७२/८५/१३, दि.१५ एप्रिल,१९९१.

२) शासन शुध्दीपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.आरटीआर-१०८५/८५३/प्र.क्र.७२/८५/१३, दि.११ जून,१९९१.

३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग,क्र.आरटीआर-१०८५/८५३/प्र.क्र.७२/८५/१३, दि.२९ जून,१९९३ .

४) शासन निर्णय , सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-१०९४/प्र.क्र.४/९४/१२, दि.७ मार्च, १९९६.

५) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.बीसीसी-१०९७/प्र.क्र.६३/९७/१६-ब, दि.१८ ऑक्टोबर,१९९७.

६) शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक आरटीआर-१४०३/८४/प्र.क्र.५४/०३/१३, दि.१० मे,२००५.

**प्रस्तावना**

उपरोक्त क्र.१,२,३ व ६ येथील शासन निर्णयान्वये चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना लिपिक-टंकलेखक संवर्गात पदोन्नती देण्यासाठी अटी व शर्ती विहित करण्यात आल्या आहेत. यापैकी अनुक्रमांक-६ येथील शासन निर्णयान्वये चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना पदोन्नती देतांना लिपिक-टंकलेखक संवर्ग संख्येच्या एकूण मंजूर पदसंख्येच्या २५ टक्के पदावर पदोन्नती देण्याचे आदेश आहेत.

२. तथापि, अनेक प्रशासकीय विभागांच्या आस्थापनांतर्गत लिपिक-टंकलेखकाची पदे २५ टक्के प्रमाणानुसार पदोन्नतीने भरण्यासाठी पात्र उमेदवार उपलब्ध नसल्यामुळे मोठया प्रमाणावर रिक्त रहात/राहिल्याचे निदर्शनास आले आहे. राज्य शासनाची पद भरती मोहिम विचारात घेता लिपिक-टंकलेखक संवर्गातील २५ टक्के प्रमाणात पदे गट-ड मधून पदोन्नतीने भरण्याच्या निर्णयाचा पुनर्विचार करावा अशी मागणी विविध प्रशासकीय विभागांनी केली होती.

**शासन निर्णय**

वरील सर्व बाबी विचारात घेऊन गट "ड" मधील पात्र कर्मचाऱ्यांना गट "क" मधील लिपिक-टंकलेखक या पदावर पदोन्नती देण्याबाबतच्या दि.१०.५.२००५ च्या आदेशामध्ये अंशत: बदल करुन आता खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत.

वरील बदलानंतर ज्या आस्थापनांमध्ये गट-ड मधून गट-क मधील लिपिक-टंकलेखक पदावर पदोन्नती देण्यासाठी २५ टक्के पर्यंतच्या मर्यादेत उमेदवार उपलब्ध नसतील अशा आस्थापनेवरील पदे सरळसेवेने भरता येतील.

ज्या कार्यालयात लिपिकवर्गीयांची पदे ४ पेक्षा कमी आहेत त्या कार्यालयाकरीता दि.१०.५.२००५ च्या शासन निर्णय मधील सुत्राचा अवलंब करावा.

| लिपिकवर्गीय पदांची संख्या | गट "ड" मधील पदोन्नतीसाठी नियत करावयाची कमाल पदे |
|---|---|
| १ | ० |
| २ | १ |
| ३ | १ |

२) संदर्भाधीन क्रमांक १ ते ३ व ६ येथील दि.१५.४.१९९१, दि.११.६.१९१, दि.२१.६.१९९३ व दि.१०.५.२००५ च्या आदेशातील इतर अटी यापुढे देखील तशाच काम राहतील.

वरील शासन निर्णय निर्गमित केल्याच्या दिनांकापासून अंमलात येईल.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २००८०७०८१७३१५८००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(प्र.ल.पाठक)

उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपालांचे सचिव, राजभवन मलबार हिल, मुंबई

मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव

* प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,

* प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई

* प्रबंधक, लोकआयुक्त व उप लोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,

* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,

* सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय (विधानसभा), मुंबई,

* सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय (विधानपरिषद), मुंबई,

* राज्य निवडणूक आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर, मुंबई,

महालेखापाल-१ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर

महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर

सर्व विभागीय आयुक्त,